28 SEP 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ संघाला राष्ट्रीय युवा संसद पुरस्कार

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून विद्यार्थ्यांचे कौतुक

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत यंदा प्रथमच राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्राप्त करून संघातील विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाचा लौकिक उंचावला, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले. राष्ट्रीय पुरस्कार वितरण समारंभात प्रदान करण्यात आलेल्या ट्रॉफीसह संघाने कुलगुरू डॉ. शिंदे यांची भेट घेतली. याप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. शिंदे यांनी संघाचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांच्यासह सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे स्पर्धेतील एकूण चमकदार कामगिरीबद्दल कौतुक व अभिनंदन केले. या यशस्वी विद्यार्थ्यांना भावी जीवनात निश्चितपणे सकारात्मक लाभ होईल. सार्वजनिक जीवनात वावरतानाही देशाचा लौकिक वाढेल, असे योगदान त्यांनी द्यावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

१४ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत यंदा विद्यापीठाच्या संघाने दमदार कामगिरीच्या जोरावर प्रथमच राष्ट्रीय स्पर्धेपर्यंत झेप घेतली. संघातील उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या आठ विद्यार्थ्यांना 'बेस्ट परफॉर्मन्स प्राईझ विनर' पुरस्कार जाहीर झाला होता. याचा पारितोषिक वितरण समारंभ नुकताच नवी दिल्ली येथील भारतीय संसद भवनाच्या बालयोगी सभागृहात पार पडला. संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या हस्ते हा पारितोषिक वितरण समारंभ झाला. या स्पर्धेत देशभरातून एकूण ७४ संघ सहभागी झाले होते. शिवाजी विद्यापीठाच्या संघाने पश्चिम विभागात सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावून राष्ट्रीय स्पर्धेपर्यंत झेप घेतली होती. यावेळी विभागीय सांघिक पारितोषिकासह संघातील निकिता पिसे, अभिजीत ताम्हणकर, शैलेश चिले, श्रेयश मोहिते, विनायक साळुंखे, गौरी काटे, हेरंब सावंत व आकांक्षा पाटील या आठ विद्यार्थ्यांना बेस्ट परफॉर्मन्स पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.



**कोल्हापूर : राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेतील पुरस्कार प्राप्त विद्यार्थी संघाबरोबर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. प्रल्हाद माने आदी.**

28 SEP 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा संसद स्पर्धेत सहभागी संघाने विद्यापीठाचा लौकिक उंचावला

## – कुलगुरू देवानंद शिंदे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत यंदा प्रथमच राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्राप्त करून संघातील विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाचा लौकिक उंचावला, असे उद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले. राष्ट्रीय पुरस्कार वितरण समारंभात प्रदान करण्यात आलेल्या ट्रॉफीसह संघाने कुलगुरू डॉ. शिंदे यांची भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी संघाचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांच्यासह सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे स्पर्धेतील एकूण चमकदार कामगिरीबद्दल कौतुक व अभिनंदन केले. या यशाचा विद्यार्थ्यांना भावी जीवनात निश्चितपणे सकारात्मक लाभ होईल. सार्वजनिक जीवनात वावरतानाही देशाचा लौकिक वाढेल असे योगदान त्यांनी द्यावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.



दिल्ली : केंद्रीय संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या हस्ते ट्रॉफी स्वीकारताना डॉ. प्रल्हाद माने यांच्यासह शिवाजी विद्यापीठाचा संघ.

१४ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत यंदा शिवाजी विद्यापीठाच्या संघाने दमदार कामगिरीच्या जोरावर प्रथमच राष्ट्रीय स्पर्धेपर्यंत झेप घेतली. या संघाला विभागीय स्तरावर अव्वल दर्जाची कामगिरी बजावल्याबद्दल आणि या संघातील उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या आठ विद्यार्थ्यांना 'बेस्ट परफॉर्मन्स प्राईझ विनर' पुरस्कार जाहीर झाला.

या १४ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ नुकताच नवी दिल्ली येथील भारतीय संसद भवनाच्या बालयोगी सभागृहात झाला. संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या हस्ते पारितोषिक वितरण समारंभ झाला. स्पर्धेत देशभरातून एकूण ७४ संघ सहभागी झाले होते. शिवाजी विद्यापीठाच्या संघाने पश्चिम विभागात सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावून राष्ट्रीय स्पर्धेपर्यंत झेप घेतली. यावेळी विभागीय सांघिक पारितोषिकासह संघातील निकिता पिसे, अभिजित ताम्हणकर, शैलेश चिले, श्रेयश मोहिते, विनायक साळुंखे, गौरी काटे, हेरंब सावंत व आकांक्षा पाटील या आठ विद्यार्थ्यांना बेस्ट परफॉर्मन्स पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. या विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

# ध्वनिप्रदूषण तीव्रतेत चढ-उतार



## गणेशोत्सव मिरवणुकीत पर्यावरणशास्त्र विभागाचे सर्वेक्षण

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. २७ : यंदाच्या गणेशोत्सव मिरवणुकीत ध्वनिप्रदूषणाच्या तीव्रतेत चढ-उतार राहिला. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागातर्फे ध्वनिप्रदूषणाचे सर्वेक्षण झाले. दोन-तीन मंडळांची मिरवणूक एकत्र आल्याने प्रदूषण वाढल्याचे विभागातर्फे सांगण्यात आले.

साउंड सिस्टीमला मनाई असल्याने पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणुका झाल्या. ढोल-ताशे, बेंजो, ऑर्केस्ट्राचा मिरवणुकीत सहभाग होता. दोन-तीन मंडळे एकत्र आल्याने ध्वनिप्रदूषणात वाढ राहिली. रेसिडेन्शियल झोनमधील उत्तरेश्वर पेठ, मंगळवार पेठ, नागाळा पार्क व ताराबाई पार्कमध्ये गतवर्षीपेक्षा प्रदूषणात घट झाली असली, तरी राजारामपुरी व शिवाजी पेठेत ध्वनीची तीव्रता वाढल्याचे दिसून आले. कमर्शियल झोनमध्ये महाद्वार रोड, गुजरी, पापाची तिकटी, गंगावेश व शाहूपुरीत प्रदूषण थोडे वाढले. मिरजकर तिकटी, बिनखांबी गणेश मंदिर, राजारामपुरी, लक्ष्मीपुरी, बिंदू चौकात प्रदूषण कमी झाले. सायलेंट झोनमध्ये सीपीआर, कोर्ट परिसरात घट, तर जिल्हाधिकारी कार्यालय व शिवाजी विद्यापीठ परिसरात वाढ झाली. इंडस्ट्रियल झोनमध्ये उद्यमनगरात ध्वनिप्रदूषणाची घट झाली. वाय. पी. पोवारनगरमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले. याबाबत पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत

यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. आसावरी जाधव, प्रा. पल्लवी भोसले, चेतन भोसले, अर्णव डंबे यांनी सर्वेक्षण केले. डॉ. राऊत म्हणाले, ''साउंड सिस्टीममुळे गतवर्षीपेक्षा यंदा मिरवणूक सुसह्य होती. पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात कोल्हापूरने पुढाकार घेतला. आता ध्वनिप्रदूषण कमी करूनही कोल्हापूरकरांनी वेगळा पायंडा पाडण्यासाठी पुढाकार घेतल्याचे दिसून आले.''

| ध्वनी तीव्रता क्षेत्र | वर्ष | |
|---|---|---|
| | २०१७ | २०१८ |
| **सायलेंट** | | |
| सीपीआर | ५५.६३ | ५४.९१ |
| कोर्ट | ५८.०९ | ५४.३ |
| जिल्हाधिकारी कार्यालय | ५६.२४ | ५६.६३ |
| शिवाजी विद्यापीठ | ४६.३६ | ४३.६१ |
| **रेसिडेन्शियल** | | |
| राजारामपुरी | ४९.१३ | ५१.३३ |
| उत्तरेश्वर पेठ | ६६.२४ | ६४.४७ |
| शिवाजी पेठ | ५०.९६ | ६९.१३ |
| मंगळवार पेठ | ६०.८५ | ५७.३ |
| नागाळा पार्क | ५०.९६ | ४६.८ |
| ताराबाई पार्क | ४८.२४ | ४७.९५ |
| **कमर्शियल** | | |
| मिरजकर तिकटी | ७७.७५ | ७६.८३ |
| बिनखांबी गणेश मंदिर | ८४.६६ | ८४.३२ |
| महाद्वार रोड | ७१.६३ | ९९.२४ |
| गुजरी कॉर्नर | ७४.९२ | ८५.७६ |
| पापाची तिकटी | ८२.७३ | ८४.३५ |
| राजारामपुरी | ६३.७२ | ६०.८५ |
| लक्ष्मीपुरी | ७२.५२ | ६०.८ |
| शाहूपुरी | ५४.१३ | ५४.४२ |
| गंगावेश | ८५.४३ | ८४.७८ |
| बिंदू चौक | ७७.३६ | ७२.१६ |
| **इंडस्ट्रियल** | | |
| उद्यमनगर | ५५.६२ | ५२.६ |
| वाय. पी. पोवारनगर | ५४.३३ | ५९.१८ |

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 SEP 2018
Times of India

# Workshop on empowering women at SUK today

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Maharashtra State Commission for Women in association with Yashwantrao Chavan School of Rural Studies will host a workshop on 'Women empowerment through Digital Literacy' at the Shivaji University, Kolhapur (SUK) on Friday.

An official from the university said that the objective of the workshop was to make girls and women digitally literate, enable them to acquire basic information and skills of communication technology that would empower them to use and consume digital contents and actively participate in knowledge based activities.

"The workshop is also aimed at enhancing their education

## FOCUS ON DIGITAL LITERACY

and business transactions, increase awareness on IT initiatives and access financial, social and government services," he said.

The official further added that they wanted the participants to be able to handle the daily digital transactions like bill payments, bank transactions and e-services provided by government with ease.

The registration for the workshop is free. The first 100 participants will get a registration kit and lunch. Those participating in the workshop would be awarded certificates.

The university information bulletin on the workshop said that digital literacy was a necessity to become a part of the 'Digital India' programme. "Digital literacy is essential for working professionals in education, healthcare, citizen services, financial services and many more. It can make a difference to the socio-economic levels among the rural population," stated the bulletin.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 SEP 2018
तरुण भारत

# विद्यापीठात २ ऑक्टोबरला जिल्हास्तरीय युवा महोत्सव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत जिल्हास्तरीय ३८ वा युवा महोत्सव शनिवार २९ रोजी महावीर महाविद्यालयामध्ये होणार होता. मात्र, प्राध्यापक बेमुदत काम बंद आंदोलनात सहभागी झाल्याने मनुष्यबळाअभावी हा युवा महोत्सव घेणे शक्य नसल्याचे पत्र महावीर महाविद्यालयाने विद्यापीठ प्रशासनाला दिले. त्यामुळे हा युवा महोत्सव रद्द करून २ ऑक्टोबर रोजी शिवाजी विद्यापीठात घेण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

यंदाच्या युवा महोत्सवाचे यजमान म्हणून महावीर महाविद्यालयाला मान मिळाला होता. महोत्सव घेण्यासाठी तयारीही झाली होती. जवळपास ६० महाविद्यालयातील संघांनी नावनोंदणीही केली होती. महोत्सवातील १४ कलाप्रकारात १ हजार ८०० ते २ हजार विद्यार्थी कलाकार सहभागी होणार आहेत. मात्र संपात ९० टक्के प्राध्यापक सहभागी झाल्यामुळे अपुऱ्या मनुष्यबळावर विद्यार्थ्यांची व्यवस्था, कला प्रकारांचे नियोजन करणे शक्य नसल्याचे महावीर महाविद्यालयाने विद्यापीठाला कळविले. विद्यार्थी हित लक्षात घेवून २ ऑक्टोबर रोजी विद्यापीठात महोत्सव घेण्याचा निर्णय घेतला आहे.

**जिल्हास्तरीय युवा महोत्सवाची आज नियोजन बैठक**

युवा महोत्सवासाठी शुक्रवारी (दि. २८) या समितीतील सदस्यांची बैठक घेवून, महोत्सवाचे नियोजन केले जाणार आहे. तसेच प्रत्येक महाविद्यालयालाही ऑनलाईन परिपत्रक पाठविले असल्याची माहिती विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी दिली.

सकाळ

# प्रा. राहुल माने यांची निवड



राहूल माने

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. राहुल मारुती माने यांची स्प्रिंजर जर्नलच्या केमिकल पेपर्सच्या असोसिएट एडिटरपदी निवड झाली. या पदावर निवड होणारे ते महाराष्ट्रातील एकमेव आहेत. हे जर्नल संशोधनासाठी प्रतिष्ठेचे मानले जाते. डॉ. माने हे औद्योगिक रसायनशास्त्रात सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. ते २०१० ला विद्यापीठात रुजू झाले. त्यांचे आतापर्यंत ५० हून अधिक शोधप्रबंध आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध झाले आहेत. त्यांचे 'सोलर एनर्जी' विषयावर एक पुस्तक, तर चार संशोधन पुस्तिका प्रकाशित झाल्या आहेत. ते ४० हून अधिक जर्नल्सचे परीक्षक म्हणून काम पाहत आहेत.

Kolhapur, Kolhapur-Today
28/09/2018 Page No. 6